श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## : विषय :

## माहे १५ मार्च २०२५ ते ३१ मे २०२५ या कालावधीकरीता उन्हाळी मंडप उभारण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत...

---

## : मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबतची सुचना :

माहे १५ मार्च, २०२५ ते ३१ मे, २०२५ या कालावधीकरीता उन्हाळी मंडप उभारण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) **www.siddhivinayak.org** या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटवर अपलोड करण्यात आली आहे.

---

| | |
|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा वार व दिनांक | – गुरूवार, ६ मार्च, २०२५ |
| दरपत्रके स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – मंगळवार, ११ मार्च, २०२५, सायं ०५.०० वा. पर्यंत. |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | – बुधवार, १२ मार्च, २०२५, दु ०१.०० वा. |
| स्थळ | – श्रीसिध्दिविनायक मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

| अ. क्र. | तपशील | परिशिष्ट क्र. | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | मोहोरबंद दरपत्रक मागविण्याबाबतची माहीती (Information) | परिशिष्ट १ | ३ |
| २ | अटी व शर्ती (Ruls and Regulation) | परिशिष्ट २ | ४ ते ७ |
| ३ | कामाची जबाबदारी (Work Responsibility) | परिशिष्ट ३ | ८ |
| ४ | दरपत्रकधारकाने (Technical Bid) साठी तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे | परिशिष्ट ४ | ९ |
| ५ | दरपत्रकधारकाबाबतची माहिती (Bidder Particulars) | परिशिष्ट ५ | १० |
| ६ | हमीपत्र (Declaration of the Contractor/Decorator) | परिशिष्ट ६ | ११ |
| ७ | ३ वर्षाच्या आर्थिक उलाढालीबाबतच्या प्रमाणपत्राचा नमूना (सी. ए. यांचे लेटरहेडवर) | परिशिष्ट ७ | १२ |
| ८ | मुल्य दराचा तपशील (BOQ) | परिशिष्ट ८ | १३ |

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# मोहोरबंद दरपत्रक मागविण्याबाबतची माहिती

## "परिशिष्ट १"

१. मोहोरबंद दरपत्रक लिफाफे ऑफलाईन सादर करावयाचे असल्यामुळे तांत्रिक कागदपत्रे (Technical Document) व मुल्य दर (BOQ) असे दोन लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकारांनी दोन वेगवेगळया लिफाफ्यामध्ये तांत्रिक कागदपत्रे व मुल्य दर सादर करावयाचे आहे.

२. लिफाफे लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मुल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

३. तांत्रिक कागदपत्रांच्या लिफाफ्यामध्ये पान क्र ९ वरील परिशिष्ट ४ नुसार सर्व कागदपत्रे जोडणे बंधनकारक असेल. मात्र, अनावधानाने एखादे कागदपत्र सादर करावयाचे राहिल्यास/नसल्यास कागदपत्रे अपुर्ण असल्यामुळे तांत्रिकदृष्टया अपात्र ठरविण्यात येईल. याबाबतचा अंतिम निर्णय हा खरेदी उप समिती यांचेसाठी राखीव असेल.

४. ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीतमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय खरेदी उप समितीने घेतल्यास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५. दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे.

६. दरपत्रकधारकारांनी सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. लेबर मजूरी व वाहतूक खर्च) मुल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

७. दरपत्रकधारकाची मागील तीन वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल १ कोटी पेक्षा जास्त असावी. पान क्र. १२ वरील परिशिष्ट ७ नुसार कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

८. दरपत्रकधारकाकडे देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, शासकीय, महानगर पालिका तसेच अन्यत्र भव्य महोत्सव प्रसंगी मंडप उभारण्याच्या कामाचा अनुभव असावा.

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# अटी व शर्ती

## "परिशिष्ट २"

१. उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या स्वरूपातील मंडपाच्या मूल्यदरपत्रकात BOQ मध्ये नमुद करण्यात आलेली इतर सर्व कामे विहीत वेळेत पुर्ण करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२. भाविकांना दर्शनाची अडचण होऊ नये म्हणून कालावधी संपल्यानंतर मंदिर परिसरातील मंडप तात्काळ काढणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३. उन्हाळी मंडपाचा कालावधी संपल्यानंतर ५ दिवसाच्या आत संपूर्ण परिसरातील मंडप काढणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. ५ दिवसाच्या वर मंडप काढण्यास विलंब झाला अथवा महानगर पालिकेने दंड आकारला तर दंडाची रक्कम आपल्या बिलातून वजा करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

४. मंडप उभारणीसाठी वापरण्यात येणारे साहित्य (उदा. छताचे कापड, पार्टीशन कापड, लपेट व झालर ई.) नविन व स्वच्छ असावे. मळलेले कापड वापरल्यास बिलातून २०% रक्कम वजा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५. कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास तसेच निकृष्ट दर्जाचे काम अथवा कामामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास, कामाचे कंत्राट तात्काळ रद्द करण्याचा अधिकार न्यासाला असेल.

६. कंत्राटदाराकडे मंडपाचे सर्व साहित्य साठा करून ठेवण्यासाठी स्वतःच्या मालकीचे गोडाऊन असणे आवश्यक आहे. न्यास याची खातरजमा केल्यानंतरच एल–१ दरपत्रकधारकाला कामाचे आदेश देईल. तसेच एल–१ दरपत्रकधारकाकडे स्वतःचे गोडाऊन नसल्याचे आढळून आल्यास एल–१ दरपत्रकधारकास तांत्रिक कारणास्तव अपात्र करण्यात येईल. याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७. कंत्राट कालावधीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना सुरक्षीततेचे नियम पाळणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

८. कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील १९२३ तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही. कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. या कामासाठी लावणेत येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडंन्ट फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन

## अटी व शर्ती

### "परिशिष्ट २"

कॉम्पेन्सेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतची सर्व कायदेशीर जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील. उक्त कायद्यातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

०९. मंडप उभारणीचे काम सुरू असताना निष्काळजीपणामुळे कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास न्यासामार्फत आपणाकडून नुकसान भरपाईची रक्कम आपल्या बिलातून वजा करण्यात येईल.

१०. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. कंत्राटदाराने काम करावयाचे नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णतः/अंशतः बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. त्याबाबत न्यासाचा निर्णय अंतिम राहील.

११. लेखी अथवा मौखिक आदेशानुसार दिलेल्या कामाची पुर्तता न केल्यास, तसेच असमाधानकारक काम केल्यास कंत्राटदारास दिलेले कंत्राट कोणतीही पुर्वसूचना न देता तात्काळ रद्द करण्यात येईल. याबाबत न्यासाचा निर्णय अंतिम राहिल.

१२. कंत्राट कालावधीत आपल्यामार्फत नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याना तो कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदार संबंधितांचा अपघात विमा, जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

१३. कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई घेतली जाईल. कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. मंडप उभारणीसाठी येणाऱ्या कर्मचारी/कामगारांचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घेणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

१४. मंडप उभारल्यानंतर कंत्राटदाराने स्थिरता प्रमाणपत्र (Stability Certificte) देणे बंधनकारक राहील.

१५. सर्व अटी व शर्ती या कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. सदर अटींचा भंग झाल्यास किंवा सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत अधीन राहील.

१६. श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास L-1 दरपत्रकधारकाराचे काम असमाधानकारक असल्यास आवश्यकतेनुसार L-2 दरपत्रकधारकाराला कार्यादेश देवू शकतो.

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# अटी व शर्ती

## "परिशिष्ट २"

१७. दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे खर्चासह जी. एस. टी समाविष्ट करून रक्कम भरावी.

१८. कर्मचारी वेतन कायदा १९३६, कर्मचारी नुकसान भरपाई १९६१, कर्मचारी जबाबदार कायदा १९३८, कर्मचारी नियमीत करणे व काढून टाकणेचा कायदा १९७९ नुसार वेळोवेळा झालेल्या कायदेशीर सुधारणा कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

१९. कामगार कायद्यानुसार कामाच्या कालावधीमध्ये दरपत्रकधारक स्वतःच्या खर्चाने कामगार पुरविणार असल्याने त्यांची नियुक्ती करताना न्यासाच्या आस्थापनेशी मालक व नोकर असा संबंध प्रस्थापित होणार/राहणार नाही.

२०. कंत्राटदार यांचेकडील कामगारांना निवासाची व्यवस्था न्यासाकडून पुरविली जाणार नाही.

२१. कार्यादेशाप्रमाणे काम करीत असलेल्या कामाचे केव्हाही परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

२२. जीएसटी, व्यवसाय कर, भ. नि. नि. योजना व अन्य कोणत्याही प्रकारच्या करासंदर्भातील जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

२३. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२४. कामाचा कालावधी (३१ मे २०२५ पर्यंत) पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल.

२५. कंत्राटदाराने नियुक्त केलेली पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील.

२६. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या कामामध्ये ५% ते १०% काम कमी जास्त प्रमाणात कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील.

२७. दरपत्रकातील नमूद बीड ऑफ कोटेशन (BOQ) व्यतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्यास अशा स्वरूपाचे अतिरिक्त काम कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावे.

२८. ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

२९. दरपत्रकात नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम न देता सदरील स्वतः करणे बंधनकारक राहील. उप कंत्राटदारास काम दिल्याचे निदर्शनास आल्यास बिलातून २५% रक्कम वजा करण्यात येईल. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# अटी व शर्ती

## "परिशिष्ट २"

३०. न्यासाने नेमुन दिलेली कामे ठरलेल्या वेळेत करत नसल्यास, कामात चालढकल करत असल्यास, अथवा समाधानकारक काम करत नसल्यास न्यासकडून कोणतीही पूर्व सूचना न देता कंत्राटदारास दिलेल्या कामाचे कंत्राट रद्द करण्यात करणेत येईल.

३१. कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

३२. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

३३. दरपत्रक सुचना अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्याचा किंवा आवश्यक बदलासह फेर दरपत्रके मागविण्याचा पूर्णत: अधिकार खरेदी उप समितीस राहील.

३४. दरपत्रकातील अटी शर्ती व कागदपत्रांचा अभ्यास करून दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सुचनेसंबंधी काही शंका असेल तर त्यांनी श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११, ०२२–६२४९१११२ वर संपर्क करावा.

**अ. श्रीमती. वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९९३०९४२४२८**

**ब. श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९३२४९९९०९४**

**क. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – मोबाईल क्रमांक. ९८६७७२०१११**

आपली स्नेहांकित,

(कार्यकारी अधिकारी)

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

## कामाची जबाबदारी
## "परिशिष्ट ३"

१. कामाच्या आदेशात (Work Oreder) नमूद केल्याप्रमाणे वेळापत्रकानुसार विहित वेळेत कामाची जबाबदारी पार पाडावी लागेल.

२. मंडप उभारताना योग्य उपकरणे व साहित्यांचा वापर करावा. मंदिर परिसरात काम सुरू असताना रहदारीचा मार्ग बंद करून अथवा आवश्यक चिन्ह/बोधवाक्य (Signage Board) असणारे योग्य फलक त्या ठिकाणी लावण्यात यावे.

३. मंदिरात भाविकांची गर्दी असल्यामुळे काम करताना भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास तसेच इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. काम सूरू असणाऱ्या ठिकाणी दररोज काम पुर्ण झाल्यानंतर स्वच्छता करण्यात यावी.

५. मंडप उभारताना बांधण्यात वापण्यात येणारे साहित्य (बांबू व वासे याची भाविकांना कोणतीही अडचण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. विद्युत उपकरणांवर फक्त प्रशिक्षित लायसन्स धारक इलेक्ट्रीशनने दुरुस्ती व इतर काम करावी.

७. विद्युत उपकरणांवर काम करत असताना योग्य त्या सुरक्षा साधनांचा वापर करावा. (उदा. सेफ्टी शुज, हात मोजे, लाकडी शिडी इ.)

८. मंडप काढल्यानंतर पाडण्यात येणारे खडड्े त्वरीत पुर्ववत करण्यात यावे.

९. न्यास वरिष्ठांनी दिलेल्या प्रासंगिक सूचनांना तात्काळ प्रतिसाद देणेत यावा.

१०. पर्यवेक्षकांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे लेखी अथवा मौखिक कामाची पूर्तता करावी.

११. वादळासारख्या हवामानामध्ये कामाची क्षमता प्रत्येक दिवसासाठी वाढवावी लागेल.

१२. कंत्राटदाराचा पर्यवेक्षक व न्यास प्रशासन यांच्यात समन्वय राहील याची दक्षता घ्यावी.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## दरपत्रकधारकाने तांत्रिक व मूल्य लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे

### "परिशिष्ट ४"

**अ) तांत्रिक लिफाफा**

०१. कंपनी नोंदणी दाखला **(महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट)**

०२. आयकर नोंदणी पॅन कार्ड **(कंपनीच्या नावे)**

०३. जी. एस. टी. नोंदणी दाखला **(कंपनीच्या नावे)**

०४. सन २०२३–२०२४ वर्षाचा आय. टी. आर. रिटर्नग

०५. सी. ए. यांचे लेटरहेडवर मागील ३ वर्षाच्या आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र **(परिशिष्ट ७नुसार)**

०६. प्रोव्हिडेंट फंड रजिस्ट्रेशन प्रत

०७. दरपत्रकधारकाबाबतची माहिती **(परिशिष्ट. ५ नुसार)**

०८. हमीपत्र (Declaration of the Contractor/Decorator) **(परिशिष्ट. ६ नुसार)**

**ब) मूल्य लिफाफा**

०१. मूल्य दर **(परिशिष्ट. ८ नुसार)**

# दरपत्रकधारकाबाबतची माहिती

## "परिशिष्ट ५"

## BIDDER PARTICULARS

**(Enclose with Technical Bid)**

Name of the Bidder :

Address of the Bidder :

Name of the Manufacturer(s) :

Address of the Manufacturer :

Name & address of the person to whom all references shall be made regarding this tender enquiry. :

Telephone :
Fax :
e-mail :

Witness:

| | |
|---|---|
| Signature | Signature |
| Name | Name |
| Address | Designation |
| Date | Company Seal |

हमीपत्र

"परिशिष्ट ६"

## DECLARATION OF THE CONTRACTOR/ DECORATOR

I/ We hereby declare that I/we have made myself/ourselves thoroughly conversant with the local conditions regarding all materials and labor on which I/we have based my/our rates for this tender. The specifications and leads on this work have been carefully studied and understood before submitted this tender. I/we undertake to use only the best materials approved by the Shree Siddhivinayak Ganapati Temple Trust, (Prabhadevi) Mumbai. 400 028. On his duly authorized assistant during execution of the work and to abide by these decisions.

**Signature of Contractor/ Decorator**

## "परिशिष्ट ७"

## (सी. ए. यांचे लेटरहेडवर)

### वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

महोदय,

दाखला देण्यात येतो की, मे. ————————————————————————————यांच्या

व्यवसायाची वर्ष २०२१—२२, २०२२—२३, २०२३—२४ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२१—२२ | |
| २ | वर्ष २०२२—२३ | |
| ३ | वर्ष २०२३—२४ | |
| | **एकूण तीन वर्षाची आर्थिक उलाढाल** | |

दिनांक :— / / २०२५

ठिकाण :—

लेखापरीक्षकाची सही / चार्टर्ड अकाऊटंन्ट
(नाव / सही शिक्का)

## मूल्य दरपत्रकाचा तपशील BOQ "परिशिष्ट ८"

### उन्हाच्या मोसमात माहे १५ मार्च २०२५ ते ३१ मे २०२५ पर्यंतच्या कालावधीकरीता मंडप उभारणीसाठी

| Sr. No. | Description | Qty | Unit | Rate (Inc. GST) | Amount (Inc. GST) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Hire Charges for Providing & Erecting of good quality of Weather Sunproof Cloth material for Mandap up to 14ft. height by covering with top green net and green net bottom white new cloth proper fixing on top including constructed vertical post 2 inch to 6inch to strong bamboo and wooden bullies fixing the green net and white cloth in proper shape and vertical post white cloth and color Zalar decorative finish Etc. directed by in-charges. | 13,000 | Sq. ft | | |
| 2 | Providing & fixing of Ceiling Fans for the whole event | 50 | Nos | | |
| 3 | Pedestal Fan | 10 | Nos | | |
| 4 | Metal Hallide | 20 | Nos | | |
| | | | | **Total Amount (Inc. GST)** | |